सरस्वती शिंदे एज्यूकेशन सोसायटी,

# डी.डी.शिंदे सरकार कॉलेज,कोल्हापूर

विद्यापीठ हायस्कूल, महालक्ष्मी मंदीरा जवळ, भवानी मंडप,
कोल्हापूर — ४१६ ०१२

## पा हि जे त

## समक्ष मुलाखती (Walk-in-Interview)

संस्थेमध्ये चालू शैक्षणिक वर्षाकरिता स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर (**CHB**) खालील विषयांची शिक्षक पदे भरावयाची आहेत :

| अ. क्रं. | विषय | ना—हरकत देणेत आलेली पदे | तासिका तत्वावरील एकूण भरावयाची पदे | ना—हरकत देणेत आलेल्या पदांचे आरक्षण |
|---|---|---|---|---|
| **अ) सहाय्यक प्राध्यापक** | | | | |
| १. | इंग्रजी | १ | ६ | सदर विषयाच्या पदांकरिता अजा—१ ,विजाअ—१ ,इमाव—१ , आदुघ—१ व अराखिव—२ असे आरक्षण निर्धारित करण्यात आले आहे. |
| २. | इतिहास | २ | | |
| ३. | राज्यशास्त्र | २ | | |
| ४. | बिझनेस लॉ | १ | | |

शर्ती व अटी :

१. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलल्या क्र. संकीर्ण—२०१८/(१८५/१८)/मशि—३ दि. १४.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत असून या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

२. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे भरण्यासाठी मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जा. क्र. विससं/उशि/कोवि/अ.नि.१/तासिकामान्यता/२०२२/३७४३ दि. १४/०७/२०२२ अन्वये ना—हरकत प्रमाणपत्र दिलेले असून त्यानुसार ही जाहिरात देण्यात येत आहे. शासनाच्या या ना—हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

३. तासिका तत्वावरील शिक्षकांची (**CHB**) एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल व तदनंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे नियमित सेवेचे कोणतेही हक्क तासिका तत्वावरील नियुक्त शिक्षकास प्राप्त होत नसून भविष्यात कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी त्यास करता येणार नाही.

४. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार नेमलेल्या शिक्षकाने एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करत असल्याबाबतचे, इतर महाविद्यालयामध्ये काम करत नसल्याबाबतचे हमीपत्र रु. १०० च्या स्टॅप पेपरवर संस्था/महाविद्यालय यांना सादर करणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त पदांसाठीच्या शैक्षणिक अर्हता, तासिका तत्वावरील वेतन तसेच आरक्षणाबाबतीतील अंतर्गत परिवर्तनीय व अदलाबदल इ. यासंदर्भातील बाबी शासन नियमानुसार राहतील. तथापी जाहिरातीतील मुळ संवर्गाचा उमेदवार उपलब्ध असेल तर त्यास अंतर्गत परिवर्तनीय/अदलाबदल अनुषंगीक बदल अनुज्ञेय राहणार नाही.

६. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांची गणना खुल्या/अराखीव प्रवर्गात केली जाईल. आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांनी अर्जासोबत शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र इत्यादि कागदपत्रे सादर करावीत.

७. सदरची तासिका तत्वावरील पदे भरत असताना एखाद्या मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर होणारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी इतर अन्य उपलब्ध मागास प्रवर्गातील उमेदवाराचा मुलाखतीमधील प्राविण्यावर आधारीत तात्पुरत्या नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.

८. उपरोक्त आरक्षित पदसंख्येमध्ये संस्थेने परस्पर बदल केल्यास मान्यता स्तरावर उदभवणा—या अडचणीस संबंधित संस्था जबाबदार राहील.

९. सदरची जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) अर्जदारांना पाहणीसाठी उपलब्ध आहे.

१०. इच्छुक उमेदवारांनी दि. १३/०८/२०२२ रोजी ११.०० वाजता अर्ज व आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह व झेरॉक्स प्रतींसह संस्था/महाविद्यालयात उपस्थित रहावे.

**स्थळ:**

दिनांक :

प्रभारी प्राचार्य
डी.डी.शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर